राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र.म.वि.बि./ ४८८५

दिनांक :- २२/०९/२०२१

**सत्र २०२०–२१ पासुन बॅचलर ऑफ इंजिनिअरींग (बी.ई.) या पदवीचे नाव बदलुन बॅचलर ऑफ टेक्नालॉजी (बी.टेक.) असे नामांतरण करण्याबाबत.**

## अधिसुचना

सर्व संबधीत महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यार्थी यांना या अधिसुचनेद्वारे सुचित करण्यात येते की, विद्यापीठाद्वारे सत्र २०२०–२१ पासून अभियांत्रिकी शाखेतील सर्व पदवी स्तरावरील अभ्यासक्रमाचे स्वरुप activity based learning या तत्वावर करण्यात आले असल्याने विद्यापीठाच्या विद्या परिषदेने दिनांक ३१.८.२०२१ रोजी संपन्न झालेल्या तातडीच्या सभेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत सुरु असलेल्या सर्व संलग्नीत, स्वायत्तता प्राप्त तसेच संचालीत महाविद्यालयातील बॅचलर ऑफ इंजीनियरिंग (बी.ई.) या अभ्यासक्रमाचे सत्र २०२०–२१ पासून नाव बदलून बॅचलर ऑफ टेक्नालॉजी (बी.टेक.) असे नामांतरण करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

त्यानुषंगाने सर्व संबधीतांना सुचीत करण्यात येते की, सत्र २०२०–२१ आणि त्यानंतर विद्यापीठाशी संलग्नीत स्वायत्तता प्राप्त व संचालीत महाविद्यालयात, ज्या विद्यार्थ्यांनी बॅचलर ऑफ इंजीनियरिंग (बी.ई.) या पदवीसाठी प्रथम वर्षात नियमीत विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला असेल असे सर्व विद्यार्थी यापुढे बॅचलर ऑफ टेक्नालॉजी (बी.टेक.) या पदवीकरीता समजण्यात येतील व ते उत्तीर्ण झाल्यानंतर बॅचलर ऑफ टेक्नालॉजी (बी.टेक.) म्हणून पदवी प्राप्त करण्यास पात्र ठरतील याची सर्व संबधीत विद्यार्थी व प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव (अति.कार्य),
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रतिलिपी माहितीकरीता व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :

१. संचालक,तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, महापालिका मार्ग,पत्र पेटी क्र १९६७, मेट्रो सिनेमासमोर,मुंबई ४००००१
२. सहसंचालक,तंत्रशिक्षण, नागपूर विभाग, सदर बाजार, नागपूर
३. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ,रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर
४. प्राचार्य, सर्व संलग्नीत स्वायत्तता प्राप्त व संचालीत महाविद्यालय,
५. उपकुलसचिव, (विद्या विभाग/मा. वि. क.),रा तु मा नागपूर विद्यापीठ, नागपूर

Registrar
RCOEM, N.

Scanned by CamScanner